ARTHA Poona 4.

अर्थशास्त्र, व्यापार, उद्योगधंदे, बँकिंग, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

' अर्थ एव प्रध.न: " इति कौटिल्य: अर्थमूलौ धर्मकामाविति।
—कौटिलीय अर्थशास्त्र

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : २ आ.
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3134. Licence No. 53.

वर्ष १९ | पुणें, बुधवार तारीख ८ जुलै, १९५३ | अंक २७

## विविध माहिती

**जीव वांचविणारें यंत्र**—गंगा नदींत बुडून मरणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या वाढूं लागल्यामुळें अशा विद्यार्थ्यांना वांचविणारें एक यंत्र बनारस विद्यापीठ ऑस्ट्रेलिआहून आणणार आहे. बुडालेल्या माणसाला वर काढल्यावर त्याच्या पोटांतील पाणी काढून टाकून श्वासोच्छ्वास चालू करण्यास ह्या यंत्राचा चांगला उपयोग होतो. गंगेच्या कांठावर एक बोट आणि पटाईत पोहणारे कायम तयार ठेवण्याची व्यवस्थाहि विद्यापीठ करणार आहे.

**काँग्रेसला मदत**—काँग्रेस संघटनेला आपलें दैनंदिन काम करतां यावें म्हणून सौराष्ट्रांतील विधिमंडळाच्या काँग्रेस पक्षीय सभासदांनीं आपला पगार व भत्ता पक्षाला देण्याचें ठरविलें आहे. सर्व सभासदांच्या पगाराची व भत्त्याची मिळून वार्षिक रक्कम ७५,००० रुपये होते, असें समजतें.

**उत्पन्नदायक गैरसोय**—सुप्रसिद्ध अभिनेत्री श्रीमती दुर्गाबाई खोटे ह्यांना कुत्री पाळण्याचा फार शोक आहे. गेल्या कांहीं महिन्यांत त्यांच्याकडील कुत्र्यांच्या संख्येंत बरीच वाढ झाल्यानें रहात्या जागेंत फार गैरसोय होऊं लागली. त्यांनीं कांहीं कुत्रे विकण्यासंबंधी जाहिरात दिली असतां ८ पिल्लांना मागणी येऊन श्रीमती खोटे ह्यांना ३,००० रुपये मिळाले.

**काबूलमध्यें भारतीय चित्रपट**—अफगाणिस्थानांत सरकारच्या मालकीचीं १२ चित्रगृहें असून त्यांत दाखविण्यांत येणाऱ्या चित्रपटांत ९० टक्के चित्रपट भारतीय असत. आतां कांहीं अफगाणांच्या विनंतीवरून हें प्रमाण ९५ टक्क्यांवर आणण्यांत आलें आहे असें समजतें.

**भारतामधील वैमानिकांची संख्या**—१ एप्रिल, १९५२ ह्या दिवशीं भारतांत विमानें चालविण्याचे परवाने जवळ असलेले १,६०० हिंदी वैमानिक होते, अशी माहिती कळते.

**रशिआचें नवें कर्ज**—रशिअन सरकारनें १,५०० कोटी रुबल्सचें २० वर्षें मुदतीचें कर्ज काढण्याचें ठरविलें आहे. ह्या कर्जाच्या रकमेवरील व्याजावर कर घेण्यांत येणार नाहीं. कर्जाची मुदत १९५३ आक्टोबर पासून १९७३ आक्टोबरपर्यंत राहील. राष्ट्राच्या अर्थव्यवस्थेचा अधिक विकास करण्यासाठीं हें कर्ज काढण्यांत आलें आहे.

**काम करणाऱ्या अमेरिकन स्त्रिया**—गेल्या मे महिन्यांत अमेरिकेंत काम करणाऱ्या माणसांची जितकी संख्या होती त्यापैकीं एक-तृतीयांश संख्या स्त्रियांची होती. एकूण १·९ कोटी स्त्रिया त्या महिन्यांत काम करीत होत्या. त्यांपैकीं एक चतुर्थांश स्त्रिया कचेरींतून कामें करीत होत्या आणि एक पंचमांश कारखान्यांतून कामें करीत होत्या.

**सतरंज्यांच्या धंद्यांत स्पर्धा**—सतरंज्या तयार करण्याच्या व्यवसायांत ब्रिटनला इटली आणि बेल्जम ह्या देशांतील धंद्यांशीं जबर स्पर्धा करावी लागेल, असा इशारा देण्यांत आला आहे. विशेषत: इटालिअन कारखानदारांनीं सतरंज्यांच्या किंमती आणि दर्जा ह्याबाबत बरीच आघाडी मारली आहे.

**पारा सांपडल्याची बातमी निराधार**—मध्य-प्रदेशांतील भंडारा जिल्ह्यांत एके ठिकाणीं पाऱ्याच्या खाणी सांपडल्याचें वृत्त मध्यंतरीं प्रसिद्ध झालें होतें. पण तें निराधार असल्याचें भारत सरकारच्या जिऑलॉजिकल सर्व्हेच्या एका अधिकाऱ्यानें सांगितलें.

**भारतासाठीं परकीय भांडवल?**—भारतीय सरकारच्या व्यापार आणि उद्योग खात्याचे चिटणीस श्री. अय्यंगार नुकतेच युरोपचा दौरा करून आले. त्यांनीं अशी माहिती सांगितली कीं ब्रिटिश आणि जर्मन उद्योगपती परदेशांत भांडवल गुंतविण्याचा विचार करीत आहेत.

**अमेरिकेचे हौशी प्रवासी**—अमेरिकेच्या व्यापार खात्यानें अशी माहिती जाहीर केली आहे, कीं गेल्या वर्षी हौशी अमेरिकन प्रवाशांनीं परदेशांत १०० कोटी डॉलर्स खर्च केले. त्यांतल्या त्यांत युरोप आणि मध्य पूर्वेतील देशांत अधिक अमेरिकन प्रवासी गेले. परदेशीय विमान-कंपन्या आणि बोट-कंपन्या ह्यांना भाड्याच्या रूपानें १७·५ कोटी डॉलर्सची प्राप्ति झाली.

**खेळाचें सामान विकून कमाई**—१९५२ सालांत पाकिस्ताननें फुटबॉल, टेनिस रॅकेटस् व फ्रेम्स ह्यासारखें खेळाचें साहित्य विकून ४ कोटी, १० लाख रुपयांची कमाई केली. ब्रिटन, मलाया आणि दक्षिण आफ्रिका हीं पाकिस्तानचीं मुख्य गिऱ्हाइकें आहेत.

**इजिप्तला क्रुप्स कारखान्याची मदत**—जर्मनीमधील प्रसिद्ध क्रुप्स कारखान्याच्या मदतीनें इजिप्तचें सरकार पोलादाचे दोन कारखाने काढणार आहे असें समजतें. ह्या कारखान्यांत इजिप्तमधील व दक्षिण आफ्रिकेमधील स्वस्त कोळसा वापरण्यांत येणार आहे. दोन्हीं कारखान्यांना मिळून १ कोटी पौंड भांडवल लागणार आहे. कारखाने सुरू झाल्यावर उत्तम प्रतीचें पोलाद स्वस्त दरांत बाजारपेठेंत येऊं लागेल.

**१५ सेकंदाला एक मोटार**—ब्रिटनमधील मोटारींच्या कारखान्यांनीं गेल्या मे महिन्यांत १५ सेकंदागणिक एक मोटार तयार केली. त्यामुळें मे महिन्यांत सर्वांत अधिक म्हणजे ५०,६०० मोटारी तयार झाल्या. त्याच महिन्यांत ३१,००० मोटारी परदेशीं बाजारांत पाठविण्यांत आल्या. कानडानें सर्वांत अधिक म्हणजे ५,६९५ मोटारी घेतल्या व ब्रिटनला २०,००,००० डॉलर्सची प्राप्ति करून दिली.

### स्थापत्य विशारदांना श्री. नंदा ह्यांचा सल्ला

"भारताचा पाया घालण्याचे कामीं त्यांना महत्त्वाची कामगिरी करावयाची आहे. आपल्या पात्रतेनुसार त्यांना देशाची सर्वोत्कृष्टपणें सेवा करावयाची असल्यास त्यांनीं आपल्या कामांत आणखी सुधारणा करावी. विशेषतः त्यांनीं कमींत कमी खर्चांत जास्तींत जास्त काम उठविण्याचा प्रयत्न' केला पाहिजे. खर्चासंबंधीची ही जाणीव म्हणजे खरीखुरी देशसेवा होय. अकार्यक्षमता, नाश अगर लांचलुचपत यामुळें होणाऱ्या नुकसानीमुळें देशाच्या गरीब जनतेवरील ओझें वाढेल. दुसरी गोष्ट म्हणजे योजनांचे अंदाज आणि हिशेब या संबंधांत स्थापत्यविशारदांनीं अधिक दक्षता व शिस्त दाखविली पाहिजे. मागील काळांत पाटबंधारे व वीजनिर्मितीच्या योजनांशीं लोकांचा फारसा संबंध येत नसे; परंतु सध्यां देशभर चाललेल्या योजना म्हणजे नवभारताचीं प्रतीकें होत व त्यांत आपण सगळे गुंतलों आहोंत. या योजनांमुळें फायदा होणाऱ्या लोकांत उत्साह निर्माण करून त्यांच्या शक्तीचा आपण उपयोग करून न घेतल्यास, आपल्या प्रयत्नामागील प्रवृत्तीचें पुरेसें दर्शन होणार नाहीं. यासाठी व बचत साधण्याकरितां कालव्यांचें व योजनेशीं संबंधित असलेल्या इतर कामांचें बांधकाम हातीं घेण्यासाठी खेड्यांतून सहकारी संस्थांची उभारणी झाली पाहिजे यावर पंचवार्षिक योजनेंत भर दिला आहे. याबाबतींत फारशी प्रगति होत नसल्यानें, स्थापत्यविशारदांनीं सामुहिक प्रयत्नांची वाढ करण्यासाठी खटपट करावी. म्हणजे त्यांच्या कामाची लोकांना चांगली कल्पना येईल.":—काक्रापार धरणाचें उद्घाटन करतेवेळीं, मध्यवर्ती नियोजन—पाटबंधारे—विद्युत् खात्याचे मंत्री श्री. गुलझारीलाल नंदा ह्यांचें भाषण. २९—६—५३.

---

### वेस्टर्न इंडिया ट्रस्टी ॲण्ड एक्झिक्यूटर कं. लि.

सातारा येथील ट्रस्टी कंपनीकडे असलेल्या विमा कंपनीकडील दोन कारकुनांचा पगार १९५१ सालअखेर पावेतों विमा कंपनीच ट्रस्टी कंपनीकरितां खर्ची टाकीत आली, परंतु १९५२ सालचा वरील दोन्ही कारकुनांचा पगार व तदनुषंगिक खर्च ट्रस्टी कंपनी आपल्या नफ्यांतून भागवूं शकली, यावरून त्या कंपनीच्या कार्याची व्याप्ति वाढत आहे व संस्था आपल्या पायावर दिवसेंदिवस उभी राहूं शकत आहे हें नमूद करण्यास संतोष वाटतो. विश्वस्तपत्राचे रूपानें ट्रस्टी कंपनीकडे १९५२ सालीं रु. २७,५७५ चें नवीन काम आलें असून १९५२ सालअखेर एकूण काम ५,८६,०३१ रु. ५ आणे चें आहे. घरभाडें वसुलीचेंही काम याच सालांत मिळालें असून अशा मिळकतीची एकंदर किंमत १,५०,००० रु असून मुखत्यारपत्राप्रमाणें कंपनीकडे असलेल्या घर—मिळकतांची एकंदर किंमत १५,७७,९०० रुपयांची आहे.

---

### १९५३–५५ च्या कर्जाची परतफेड

तीन टक्के दराच्या १९५३–५५ कर्जापैकी (चवथें संरक्षण कर्ज) उरलेल्या रकमेची परतफेड १५ जुलै, १९५३ रोजीं करण्यांत येईल व त्या दिनांकापासून त्यावर व्याज लागूं होणार नाहीं. त्या ठरलेल्या दिनांलास कर्जाची परतफेड करणें सुलभ व्हावें म्हणून हे रोखे धारण करणाऱ्यांनीं त्यांत दर्शविलेले किंवा व्याज मिळण्यासाठी नोंदविलेलें पब्लिक डेटऑफिस, ट्रेझरी अगर इंपीरियल बँक ऑफ इंडियाची शाखा यांचेकडे आपापले रोखे ६ जुलै, १९५३ रोजीं वा त्यानंतर सादर करावेत. या रोख्यांची किंमत मिळण्यासंबंधीच्या पद्धतीची समग्र माहिती कोणतेंहि पब्लिक डेटऑफिस, इंपीरियल बँक ऑफ इंडियाची शाखा अगर ट्रेझरी यांचेकडे अर्ज करून मिळूं शकेल.


# पुणें जिल्हा सहकारी खरेदी-विक्री संघ लि.

११५।११६ भवानी पेठ, गूळ आळी, पुणें २.

तारेचा पत्ताः—सॅनको सोप. टेलिफोन नं. ३११५

(जिल्ह्यांतील शेतकरी व नागरी जनतेस दैनंदिन गरजेच्या वस्तु पुरविणें व शेतकऱ्यांचा माल किफायतशीर विकून देणें, या उद्देशानें स्थापन झालेली जिल्ह्यांतील मध्यवर्ती संस्था)

**संस्थेकडे खालीलसाठी लिहा अगर समक्ष भेटा.**

★शेतीचीं सर्व प्रकारचीं अवजारें, ऊंस गाळण्याचे चरक, सल्फेट व इतर खतें, पिकांच्या रोगांवरील औषधें, पेंड.

★शेतकी खात्यामार्फत जिल्ह्यांत होणारें पेंड, खतें व मिक्श्चर यांचें वांटप या संस्थेमार्फतच करण्यांत येतें.

★पुणें जिल्हा ग्रामसुधारणा मंडळाच्या विद्यमानें चालू असलेल्या नियंत्रित लोखंड, सिमेंट वांटप योजनेंतील—गाड्यांचे आंस, धांवपट्ट्या, नळीचे पत्रे, प्लेन पत्रे, वगैरे व सिमेंट.

★ग्राहक सहकारी संस्थांना लागणारा माल संघाच्या अडत दुकानामार्फत पुरविला जातो.

★शेतकऱ्यांचा शेतीचा माल संस्थेच्या अडत दुकानामार्फत पुणें येथील बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जातो.

★जिल्ह्याबाहेरील शेतकरी व सहकारी संस्था यांचा माल पुणें बाजारपेठेंत किफायतशीर रीतीनें विकून दिला जाईल.

---

# दि रत्नाकर बँक, लि.

(कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली)

स्थापना : १९४३

मुख्य कचेरीः भाऊसिंगजी रोड, कोल्हापूर

शाखा—सांगली, शाहूपुरी, मिरज, जयसिंगपूर.

| | | रु. |
|---|---|---|
| अधिकृत भांडवल | ... | १०,११,००० |
| विक्री केलेलें शेअर भांडवल | ... | १०,०६,६०० |
| रोख वसूल शेअर भांडवल | ... | ५,०३,३०० |
| रिझर्व्ह व इतर फंड | ... | १,०८,४०० |
| खेळतें भांडवल (अंदाजें) | ... | ४७,६६,००० |

—अद्यावत् बँकिंग व्यवहार केले जातात—

श्री. वी. बी. पाटील, B. A., LL. B., वकील, सांगली, चेअरमन

श्री. गंगाराम सिद्दाप्पा चौगुले, कोल्हापूर, व्हा. चेअरमन

एल. एन्. शहा, B. Com., C. A. I. I. B. मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ८ जुलै, १९५३





संस्थापक :
प्रो. वामन गोविंद काळे

संपादक :
श्रीपाद वामन काळे


## १९५२ सालांतील भारतामधील बँकिंग

रिझर्व्ह बँकेचा, बँकिंग कंपनीज ॲक्ट १९४९ च्या ३६ (२) कलमाखालील अहवाल* नुकताच प्रसिद्ध झाला आहे, त्यांत १९५२ मधील हिंदी बँकिंगचा आढावा घेण्यांत आला आहे. १९५२ हें वर्ष बँकांना बरें गेलें. बँकांनीं दिलेल्या कर्जाची रक्कम कमी झाल्यामुळें बँकांवरील ताण कमी झाला. बिल मार्केट योजनेप्रमाणें रिझर्व्ह बँकेकडून बँकांना कर्ज मिळूं लागलें ही गेल्या वर्षांतील एक महत्त्वाची घटना आहे. मुदतीनुसार आपोआप कर्जफेड घडवून आणणाऱ्या हुंड्यांच्या रीडिस्कौंटिंगमुळें खऱ्या व्यापारी व्यवहारांची कुचंबणा न होता रिझर्व्ह बँकेच्या कर्जपुरवठ्यास लवचीकपणा प्राप्त झाला. १९५१–५२ च्या मानानें १९५२–५३ मधील मोसमांतील पैशाच्या कमी मागणीमुळें, रिझर्व्ह बँकेकडून कर्ज मिळण्याच्या सोईचा अवलंब बँकांनीं कमी प्रमाणांत केला.

बिगर–शेड्यूल्ड बँकांपेक्षा सहकारी बँकांना आतां जास्त महत्त्व प्राप्त झालें असून, रिझर्व्ह बँक त्यांचेकडे अधिकाधिक लक्ष देत आहे. बिगर शेड्यूल्ड बँकांची संख्या सहकारी बँकांपेक्षा मोठी असली तरी ठेवी व कर्जें ह्या दोन्ही बाबतींत सहकारी बँकांचे व्यवहार बरेच मोठे आहेत. १९५२ मध्यें रिझर्व्ह बँकेनें राज्य सहकारी बँकांना १½% ह्या सवलतीच्या दरानें ३९१ कर्जें दिलीं, त्यांची एकूण रक्कम १०½ कोटी रुपये भरली. १९४९ सालीं २ कोटी रु., १९५० सालीं ५ कोटी रु. व १९५१ सालीं ९ कोटी रु. ह्याप्रकारें राज्य सहकारी बँकांना कर्जाऊ देण्यांत आले होते.

बँक कचेऱ्यांच्या एकूण संख्येंत जरी घट झाली, तरी शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत भर पडली. बिगर शेड्यूल्ड बँकांच्या १०४ शाखा १९५२ मध्यें बंद झाल्या; म्हणजे १९४७ ते १९५२ ह्या मुदतींत बिगर शेड्यूल्ड बँकांच्या कचेऱ्यांत ६६० ची घट झाली. कित्येक बिगर शेड्यूल्ड बँकांचा बँकिंगचा व्यवहार बंद झाला; किमान भांडवलाची अट, बिगर–बँकिंग व्यवहारास बंदी आणि बँकिंग कंपन्यांच्या कायद्याचीं इतर बंधनें ह्यांचा तो परिणाम होता. शाखांच्या वाढीवरील नियंत्रणें व शाखा चालविण्याचा वाढता खर्च, ह्यांचाहि परिणाम झाला. शेड्यूल्ड बँक कचेऱ्यांत २५ ची वाढ झाली, त्यांपैकीं एकट्या इंपीरिअल बँकेच्या १७ कचेऱ्या होत्या.

बँकिंग कंपन्यांबाबतचे नियम आतां सर्व राज्यांत लागू झाले आहेत आणि सबंध भारतांतील बँकिंग एकसूत्री नियंत्रणाखालीं आलें आहे. बँकांच्या तपासणीमुळें, बँकांच्या कार्यपद्धतीचें सूक्ष्म निरीक्षण करण्याची संधि रिझर्व्ह बँकेस मिळाली. विशेषत: बिगर शेड्यूल्ड बँकांपैकीं कांहीं बँकांचे कारभारांत गैरवाजवी पद्धति आढळल्या. अननुभवी व न शिकलेला नोकरवर्ग, हिशेबाच्या वह्या नीट न ठेवणें, डायरेक्टर बोर्डाचें दुर्लक्ष, मुख्य कचेरीचें शाखेवर योग्य नियंत्रण नसणें, बँका जुन्या असल्या तरी रिझर्व्हज् असमाधानकारक असणें, इनव्हेस्टमेंटस्च्या पुस्तकी किंमतींत घसारा आला असला तरी त्याची अपुरी तरतूद, ठेवी आकर्षिण्यासाठीं भारी दरानें व्याज देणें, इत्यादि दोष महत्त्वाचे आहेत. कर्जाचें प्रमाण भारी असणें आणि त्यांतहि विनातारण किंवा जमिन-जुमल्याच्या तारणावरील कर्जें जास्त असणें, हेहि दोष कित्येक बँकांत आढळले. कांहीं वेळा डायरेक्टरांना, त्यांच्या नातेवाइकांना किंवा सहकाऱ्यांना आणि त्यांचे हितसंबंध असलेल्या फर्म्सना मोठालीं कर्जें दिलेलीं असतात. मालाचे तारणावर कर्जें दिलीं असलीं, तर बँकेचा बोर्ड लावणें, आगीचा विमा उतरणें, इत्यादींबाबत दक्षता घेतली जात नाहीं. ज्या त्या बँकेच्या कारभारांत आढळलेले दोष जिला तिला दाखवून दिले जातात व तिचेकडून प्रगतीचे वेळोवेळ अहवाल मागविले जातात. त्या अहवालांची रिझर्व्ह बँक छाननी करते आणि जरूर त्या सूचना संबंधित बँकेला देते.

खेडेगांवांतील कर्जपुरवठाविषयक अखिल भारतीय पहाणी आतां पुरी झाली आहे. त्याच्या निष्कर्षांची वाट न पहातां, सहकारी बँकांमार्फत सोई वाढविण्याचा रिझर्व्ह बँकेचा प्रयत्न चालू आहे आणि ज्या राज्यांत केंद्रीय बँका नाहींत तेथें त्या स्थापन करण्यांत येत आहेत. देशाचा आर्थिक विकास होत जाईल, त्याप्रमाणें बँकांवरील त्याबाबत जबाबदारीहि वाढेल हें उघड आहे. पंचवार्षिक योजनेमुळें, चालना मिळालेल्या खाजगी, औद्योगिक उपक्रमांस खेळतें भांडवल वाढत्या प्रमाणावर लागेल आणि बँकांची त्यांना मदत भासेल.

* ट्रेन्ड अँड प्रोग्रेस ऑफ बँकिंग इन इंडिया. किं. ३ रु. डिपार्टमेंट ऑफ रिसर्च अँड स्टॅटिस्टिक्स, रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया, मुंबई १.

---

### शेड्यूल्ड व बिगर–शेड्यूल्ड बँक कचेऱ्या

| | शेड्यूल्ड बँका | बिगर-शेड्यूल्ड बँका | सर्व बँका |
|---|---|---|---|
| १९४६ | २,८५७ | २,०२९ | ४,८८६ |
| १९४७ | २,९८७ | १,८३२ | ४,८१९ |
| १९४८ | २,९६३ | १,७११ | ४,६७४ |
| १९४९ | २,८५२ | १,५८९ | ४,४४१ |
| १९५० | २,७७९ | १,५७४ | ४,३५३ |
| १९५१ | २,६६७ | १,४७३ | ४,१४० |
| १९५२ | २,६९२ | १,३६९ | ४,०६१ |

---

### टेलिफोन्सच्या बाबतींत सिंगापूरचा पुढाकार

आशियांतील सर्व शहरांत सिंगापूर येथें टेलिफोन्सच्या संख्येचें लोकसंख्येशीं प्रमाण सर्वांत ज्यास्त आढळतें. तेथील २% लोकांजवळ टेलिफोन आहे. मुंबई व हाँगकाँग येथील तत्सम प्रमाण १·५% असून कलकत्ता १% आणि कराची ०·६% अशीं त्या शहरांतील प्रमाणें आहेत.

---

### निर्वासितांवरील सरकारी खर्च

पूर्व व पश्चिम पाकिस्तानांतून भारतांत आलेल्या निर्वासितांवर सरकारचे १९४७ पासून मार्च १९५३ अखेर १७८ कोटी रुपये खर्च झाले. त्यांपैकीं ६० कोटी निर्वासितांच्या रहाण्याच्या व्यवस्थेवर व ४० कोटी वैयक्तिक कर्जांवर खर्च झाले. १९५३–५४ मध्यें निर्वासितांवर आणखी ३२ कोटी रुपये खर्च झाले, म्हणजे ३१ मार्च, १९५३ अखेरच्या खर्चाची रक्कम २१० कोटी रुपये होईल.

## सहकारी बँकांच्या पुनर्घटनेची रूपरेषा

रिझर्व्ह बँकेच्या अधिकाऱ्यांनीं वेगवेगळ्या राज्यांत जाऊन समक्ष जागेवर परिस्थितीची पहाणी केली, त्याच्या आधारावर बँकेनें सहकारी भांडवल पुरवठ्याबाबत निश्चित केलेल्या धोरणाची कल्पना श्री. के. माधव दास ह्यांनीं आपल्या लेखांत दिली आहे.* प्राथमिक पतपेढ्यांच्या सुदृढपणावरच अखेर भांडवल पुरवठ्याच्या योजनेचें यश अवलंबून रहाणार, हें उघड आहे. कित्येक राज्यांतील हा पाया मजबूत नसून, त्याच्या पुनर्रचनेची अत्यंत आवश्यकता आहे. ज्या पतपेढ्यांचें पुनरुज्जीवन करतां येणार नाहीं त्या बंद करणें, फायद्यांत चालू न शकणाऱ्या किंवा कार्यक्षम नसलेल्या पतपेढ्यांचें तण काढून टाकणें, शक्य तेथें लहान पतपेढ्यांचें एकत्रीकरण करणें व किफायतशीर पतपेढ्या त्यांतून निर्माण करणें, हे मार्ग सुचविण्यांत आले आहेत. व्यवस्था खर्चास सरकारनें प्रारंभीच्या काळीं मदत करावी, अशीहि एक सूचना आहे. पुनर्रचित पतपेढ्यांच्या विविध कार्यांच्या स्वरूपावर भर देण्यांत आला असला, तरी आवाक्याबाहेरचीं कामें त्यांनीं अंगावर घेऊन उपलब्ध साधनांवर ताण पाडूं नये, ह्याची दक्षता घेण्याचें महत्त्वहि प्रतिपादन करण्यांत आलें आहे.

कित्येक राज्यांतील मध्यवर्ती सहकारी बँका ( राज्य सहकारी बँका व पतपेढ्या ह्यांचेमधील दुवा ) ह्या लहान व आर्थिक दृष्ट्या कमकुवत अशा आहेत, आणि त्यांचें उद्दिष्ट कार्यक्षम रीतीनें पार पाडण्यास त्या असमर्थ आहेत. त्यांचेपैकी कित्येकांची ठेवींची परिस्थितीहि समाधानकारक नसते. सेव्हिंग्ज व करंट ठेवी न स्वीकारणाऱ्या कित्येक मध्यवर्ती बँका आहेत; सहाजीकच त्यांच्या स्वतःच्या कर्ज उभारणीचा सरासरी व्याजाचा दर जबर पडतो व त्यांना जोडलेल्या पतपेढ्यांना वाजवी दरानें कर्जें देणें त्यांना शक्य होत नाहीं. चांगला नोकरवर्ग नेमणें त्यांना परवडत नाहीं. सहकारी बँकांचें कार्यक्षेत्र विस्तृत असलें, म्हणजे त्यांच्या ओव्हरहेड खर्चांत बचत होते, वाजवी व्याजाच्या दरानें त्यांना ठेवी मिळूं शकतात, जोडलेल्या पतपेढ्यांना स्वस्त दरानें त्या कर्जें देऊं शकतात, कर्जविषयक धोरणांवर योग्य नियंत्रण रहातें, वरिष्ठ दर्जाचे नोकर नेमतांना निवडीस वाव मिळतो आणि सत्ता थोड्यांच्याच हातीं केंद्रित होण्याच्या प्रवृत्तीस आळा बसतो. ह्या बँकांची सुधारणा, ही पुनर्घटनेच्या कार्यक्रमांतील एक अत्यंत महत्त्वाची बाब आहे, आणि त्या दृष्टीनें रिझर्व्ह बँकेनें सुधारणेच्या बऱ्याच सूचना केलेल्या आहेत. भोपाळ, हिमाचल प्रदेश, विंध्य प्रदेश, इत्यादि राज्यांचें क्षेत्र लहान असल्यामुळें, तेथील राज्य सहकारी बँकेनेंच आपल्या शाखांचे मार्फत प्राथमिक सहकारी बँकांशीं व्यवहार करावा, असें सुचविण्यांत आलें आहे.

सबंध चळवळीस स्थैर्य प्राप्त करून देण्याचे दृष्टीनें राज्य सहकारी बँकांची निर्मिति किंवा पुनर्रचना ह्यांवर रिझर्व्ह बँकेनें भर दिला आहे. शेअर भांडवल मजबूत असावें असा रिझर्व्ह बँकेचा आग्रह आहे. नव्या किंवा गैरमजबूत सहकारी संस्था राज्य सहकारी बँकेचे फारसे भाग घेऊं शकणार नाहींत; सरकारनेंच शेअर भांडवलाचा मोठा वाटा उचलावा, अशी रिझर्व्ह बँकेची शिफारस आहे. सौराष्ट्र व पेप्सु ह्यांत नव्या राज्य सहकारी बँकांची स्थापना झालेली आहे आणि मध्य भारत व राजस्थान ह्यांत ती होऊं घातली आहे. हैद्राबाद, म्हैसूर, इत्यादि राज्य सहकारी बँकांची पुनर्घटना रिझर्व्ह बँकेच्या सूचनांप्रमाणें करण्याच्या प्रयत्नांत तेथील सरकारें आहेत. भोपाळ आणि हिमाचल प्रदेश येथील कांहीं बँकांचें राज्य सहकारी बँकांत रूपांतर केलें जाणार आहे; त्यांना कांहीं मुदतीपुरताच व्यापारी बँकांचा व्यवहार चालू ठेवण्यास परवानगी दिली जाईल. ह्या सर्वांचा परिणाम म्हणजे, सहकारी चळवळींत सरकारचा कमीजास्त हात रहाणार आहे; कांहीं राज्यांत त्याचें प्रमाण इतर ठिकाणांपेक्षा निदान प्रारंभीं तरी जास्त असेल; त्याचप्रमाणें केंद्रीय संस्थांत त्याचें प्रमाण जास्त राहील; प्राथमिक अथवा माध्यमिक संस्थांत तें बेताचें राहील.

लँड मॉर्गेज बँकांची वाढ वेगवेगळ्या राज्यांतून फारच असमान झालेली आहे. त्यांची स्थापना करण्यापूर्वी खालील गोष्टींचा विचार करण्याचें महत्त्व रिझर्व्ह बँकेनें नमूद केलें आहेः-प्रचलित जमीनधारापद्धति, जमिनीची मालकी निश्चित समजण्याची व्यवस्था व जमीन गहाण टाकण्याच्या हक्काची परिस्थिति. लँड मॉर्गेज बँकांनीं उत्पादक कार्यासाठीं घेतलेल्या कर्जांकडे विशेष लक्ष पुरविलें पाहिजे. सौराष्ट्र आणि हैद्राबाद येथें आतां मध्यवर्ती लँड मॉर्गेज बँकांची स्थापना नुकतीच झाली आहे.

* "अर्थ" ता. १७ व १४ जून पहा.

## दि पूना इन्व्हेस्टर्स बँकेचा उपक्रम

चेकवर लिहिलेली रक्कम वाढवून तो चेक वटवून घेण्याचे प्रकार हल्लीं बरेच वाढले आहेत आणि त्यापासून सावध रहाण्याचा इशारा बँका खातेदारांना देत असतात. कांहीं बँकांनीं खातेदारांना क्रॉस केलेले चेकच देण्यास प्रारंभ केला आहे; शक्य तों काउंटरवर रोकड घावी-घ्यावी लागूं नये आणि पुस्तकी हिशेबानें देणें-घेणें पुरें व्हावें, हा त्याचा हेतु आहे. त्यामुळें लबाडी करणारास निसटून जाणें अवघड पडतें. ज्याला क्रॉस केलेला चेक नको असेल, त्यानें "क्रॉसिंग रद्द केलें आहे; रोख रक्कम द्या" असें चेकवर लिहावें लागतें.

दि पूना इन्व्हेस्टर्स बँकेनें ह्यापुढें जाऊन, प्रत्येक चेकवर खालीलप्रमाणें तक्ता छापला आहे. जेवढ्या रकमेचा चेक असेल,

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| NOT OVER (*Hundreds of Rupees*) | | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| NOT OVER (*Thousands of Rupees*) | | | | | | | | |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 |
| 10 | 15 | 20 | 25 | 30 | 35 | 40 | 45 | 50 |
| 55 | 60 | 65 | 70 | 75 | 80 | 85 | 90 | 100 |

त्यापुढील शेकड्यापेक्षा ज्यास्त नाहीं हें दर्शविण्यासाठीं योग्य त्या शेकड्याच्या आंकड्यास टोचानें भोंक पाडावयाचें अशी ही योजना आहे. सहस्र रुपयांच्या आंकड्यांसहि अशाच प्रकारें भोंक पाडून चेकची कमाल रक्कम निश्चित करतां येते. लिहिलेला मजकूर किंवा आंकडे ह्यांत बदल करतां आला तरी कागदास पाडलेलें भोंक बुजवितां येणार नाहीं. ह्यादृष्टीनें, श्री. भाऊसाहेब साळवेकरांची योजना ठकास हतबुद्ध करणारी आहे असें वाटतें. चेकसवरील ह्या नव्या सोईचा फायदा घेणाऱ्या गिऱ्हाइकांस व बँकांस काय अनुभव येतो व आणखी सुधारणा कोणत्या आवश्यक आहेत हें लवकरच समजून येईल. दि पूना इन्व्हेस्टर्स बँकेनें केलेल्या उपक्रमाबद्दल तिचें आम्हीं अभिनंदन करतों.

## कच्च्या रेशमाच्या आयात धोरणाबद्दल तक्रार

भारतीय सरकारनें चालू सहामाही संबंधीचें आयात धोरण नुकतेच जाहीर केलें आहे. बऱ्याच प्रकारच्या वस्तूंच्या आयाती-विषयीं भारतीय सरकारनें उदार धोरण स्वीकारलें असलें तरी कच्चें रेशीम व रेशमाचें कापड ह्याबद्दल पूर्वीचेंच धोरण पुढें चालू ठेवल्याबद्दल मुंबईचे व्यापारी श्री. चिनॉय ह्यांनीं तक्रार केली आहे. श्री. चिनॉय हे सिल्क मर्चंटस् असोसिएशन ह्या संस्थेचे अध्यक्ष आहेत. श्री. चिनॉय म्हणतात कीं, भारतामधील रेशमाचें उत्पादन गरजेच्या मानानें बरेंच कमी आहे ही वस्तुस्थिति आहे. अशा परिस्थितींत हा तुटवडा भरून काढण्याइतकें परदेशी रेशीम भारतीय सरकार आयात करूं देईल अशीच अपेक्षा बाळगणें गैर होणार नाहीं. भारतामधील रेशमाच्या धंद्याची वाढ करण्यासाठी आयातीवरील नियंत्रणाचा उपयोग करणें देशाच्या हिताच्या दृष्टीनें योग्य नाहीं. कारण, त्यामुळें देशी रेशमाच्या धंद्याला आपल्या उत्पादनांत सुधारणा करण्याची जरूर वाटेनाशी होते. देशांत रेशमाला असणारी मागणी आणि देशांतील उत्पादन ह्यांच्यांत जो फरक असेल तेवढीच आयात करावी अशी असोसिएशनची मागणी आहे. ती अमान्य करण्यांत सरकारचा काय हेतु आहे तें कळणें कठीण आहे. रेशमाच्या कापडाच्या आयाती-संबंधीहि वरील युक्तिवाद लागू पडतो. सरकारच्या नवीन धोरणाप्रमाणें मिश्र रेशमाचें कापड आयात करण्यास परवानगी देण्यांत आली आहे हें खरें. परंतु अशा प्रकारच्या कापडाच्या आयातीसाठीं देण्यांत आलेले परवाने वापरण्यांत येणार नाहींत. कारण अशा तऱ्हेचें कापड योग्य किंमतीला मिळणें बरेंच अवघड झालेलें आहे. म्हणून शुद्ध रेशमाच्या कापडासाठी परवाने देणेंच अधिक वाजवी ठरलें असतें.

## अन्नाच्या प्रश्नासंबंधीं डॉ. बेंटले ह्यांचे विचार

म्हैसूर येथें वर्ल्ड युनिव्हर्सिटी सर्व्हिस सेमिनार मध्यें भाषण करतांना डॉ. बेंटले ह्यांनीं जगांतील अन्नाच्या उत्पादनाच्या प्रश्नाविषयीं महत्त्वाचे विचार व्यक्त केले. डॉ. बेंटले म्हणाले कीं, संस्कृतीची प्रगति व्हावयाची असेल तर रिकाम्या पोटावर ती होणार नाहीं. त्याचप्रमाणें जगांत शांतता नांदण्यासाठी सुद्धां अन्नाचा प्रश्न सोडविण्यानें सर्वांत अधिक मदत होणार आहे. हा प्रश्न केवळ भारतांतच गंभीर स्वरूपाचा झाला आहे असें नाहीं. सर्व जगांतहि त्याचें स्वरूप चिंतनीय असेंच आहे. लागवडीला आणण्यासारखी फारशी जमीन आतां जगांत शिल्लक नाहीं. पण लोकसंख्या मात्र दरवर्षी १५ टक्क्यांनीं वाढत आहे. ह्याचाच अर्थ असा कीं दरडोई शेतीच्या उत्पन्नांत घट होत आहे. अर्थात् दरडोई लागवडीस आणल्या गेलेल्या एकरी क्षेत्रफळांतहि घट झाली आहे. ही समस्या सोडविण्याचा प्रयत्न एफ. ए. ओ. आणि इतर कांहीं संघटना करीत आहेत. शेतीचें आधुनिक तंत्र वापरून उत्पादन वाढविण्याचा प्रयत्न करण्यांत येत आहे. अन्नधान्याचें उत्पादन वाढविणें आणि लोकसंख्येच्या वाढीवर नियंत्रण घालणें ह्या दोन बाबतींत जागरूकता दाखविली गेली नाहीं तर माल्थसचा सिद्धांत खरा ठरण्याची वेळ लवकरच आल्यासेरीज रहाणार नाहीं. ह्याबाबतींत एक अडचण अशी आहे कीं शास्त्रज्ञ आणि तंत्रज्ञ ह्यांना ह्या-विषयासंबंधीं नीटशी जाणीव नाहीं. इतर कोठल्याहि शास्त्रापेक्षा शेतीच्या शास्त्राचा पाया अधिक व्यापक आहे आणि त्याची रचना अधिक गुंतागुंतीची आहे. तें कसेंहि असलें तरी अन्न-प्रश्नाचा विचार आपण प्रथम केला पाहिजे.




## चंबळा नदीवरील धरणाची योजना

मध्य-भारत आणि राजस्थान ह्या राज्यांचा आर्थिक विकास करणारी चंबळा धरण-योजना अंमलांत आणण्यास गेल्या २६ जानेवारीपासून प्रारंभ झाला. मध्य-भारताचे विकासमंत्री श्री. व्ही. व्ही. द्रविड ह्यांनीं योजनेच्या प्रगतीसंबंधीची माहिती नुकतीच पत्रकारांना सांगितली. गेल्या पांच महिन्यांत नदीच्या पात्रांतून ६,५०,००० घनफूट माती खणून काढण्यांत आली. त्यानंतर पावसाळा चालू झाल्यामुळें काम थांबवावें लागलें. योजनेवर काम करणाऱ्या कामगारांना रहाण्यासाठी घरें बांधण्यांत आलीं असून दुखणाइतांसाठी लवकरच एक सुसज्ज इस्पितळहि बांधण्यांत येणार आहे. मध्यंतरीं धरणाच्या पाण्याच्या वांटपासंबंधी मध्यभारत आणि राजस्थान सरकारांच्या दरम्यान कांहीं मतभेद उपस्थित झाले होते. पण आतां ते मिटविण्यांत आले असून चंबळेपासून मिळणाऱ्या पाण्यांत मध्यभारताला अर्धा वाटा देण्याचें मान्य करण्यांत आलें आहे. पावसाळा बंद झाल्यावर धरणाच्या कामास पुन्हा जोरानें प्रारंभ करण्यांत येणार आहे. काम झपाट्यानें उरकावें म्हणून दोन्ही राज्य-सरकारांचे विकासमंत्री, मुख्य चिटणीस आणि एंजिनिअर्स ह्यांचें एक कार्यकारी मंडळ बनविण्यांत आलें आहे. कार्यकारी मंडळाचे अध्यक्ष म्हणून भारताचे योजनामंत्री श्री. गुलझारीलाल नंदा हे काम पहाणार आहेत. ह्या धरणावर होणाऱ्या खर्चासंबंधीं एक विशेष गोष्ट लक्षांत ठेवण्यासारखी आहे. आतांपर्यंत २५,००,००० रुपयांची रक्कम छोटी-बचत सर्टिफिकेटस् विकून जमविण्यांत आली आहे. वर्षअखेर १०,००,००,००० रुपये किंमतीचीं सर्टिफिकेटस् विकलीं जातील असा अंदाज आहे. भांडवली खर्च करावयाचा झाल्यास सरकार-कडे अगतिकपणें पहाण्याची जी वृत्ति दिसून येते तिला हा एक शुभ अपवादच आहे. १९६० च्या अखेरीस धरण पुरें होईल असा अंदाज आहे.

## मध्य प्रदेश को. बँकेचे मॅनेजर, श्री. नी. स. देव यांचें निधन

नागपूर येथील मध्यप्रदेश को-ऑपरेटिव्ह बँकेचे मॅनेजर श्री. नी. स. देव ह्यांना दि. २५ जून रोजीं दुपारीं ११॥ च्या सुमारास माटुंगा ( मुंबई ) येथें जठोदरच्या विकारानें देवाज्ञा झाली हें कळविण्यास अत्यंत वाईट वाटतें. गेला सबंध महिना ते आजारीच होते व मुद्दाम औषधपाणी करण्यासाठी ते माटुंग्याला डॉ. फडके यांच्या नर्सिंग होममध्यें जाऊन राहिले होते. मरतेसमयीं त्यांचें वय अवघें ४३ वर्षांचें होतें. त्यांच्या पाठीमागें त्यांच्या पत्नी, २ मुलगे व २ मुली आहेत. त्यांच्या मृत्यू-निमित्त मध्यप्रदेश को. बँकेच्या नागपूरच्या शाखांना ता. २५ रोजीं सुट्टी देण्यांत आली होती.

### कृषिपंडितांचीं प्रमाणपत्रें काढून घेतलीं

पीक स्पर्धेत यशस्वी झालेल्या शेतकऱ्यांना भारत सरकारनें 'कृषिपंडित' ही पदवी दिली होती. त्या पदव्या सरकारनें आतां काढून घेतल्या आहेत. दर एकरीं १७,००० पौंड माताचें उत्पन्न येणें विश्वासार्ह नाहीं, असें आढळून आलें आहे. उत्पन्नाच्या आकड्यांचा खरेपणा पडताळून पाहिल्याविना, स्पर्धेच्या निकालावर कोणाचा विश्वास बसणार नाहीं. म्हणून, चालू वर्षी प्रत्येक राज्य सरकारनें पहिल्या सहा उमेदवारांचीं नांवें मध्यवर्ती सरकारकडे पाठवावीत; त्यांच्यातील स्पर्धेस "कृषिपंडित" प्रमाणपत्रें देण्यांत येतील, असें भारत सरकारनें जाहीर केलें आहे.

### पाण्यासाठी ट्यूब विहिरी

एलिचपूर ते जळगांव ह्या शंभर मैलांच्या पूर्णा नदीच्या खोऱ्यांत व जबलपूर ते खांडवा ह्या नर्मदेच्या खोऱ्यांत प्रत्येकीं १५ ट्यूब विहिरी खोदण्याचें मध्यप्रदेश सरकारनें ठरविलें आहे. हा प्रयोग यशस्वी झाल्यास आणखीहि विहिरी खोदण्यांत येतील असें समजतें.

### नानासाहेब पेशवे १९२६ पर्यंत हयात होते ?

१८५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाचे पुढारी नानासाहेब पेशवे हे १८५८ मध्यें नेपाळमध्यें मृत्यू पावले असें इतिहासांत सांगितलेलें आहे. आपण नानासाहेबांचे नातू आहोंत असें सांगणारे बाजीराव उर्फ सुरज प्रताप ह्यांनीं कांहीं दिवसांपूर्वी उत्तर प्रदेश असेंब्लीचे अध्यक्ष, श्री. खेर ह्यांची गांठ घेऊन त्यांना अझिमुल्लाखानच्या रोजनिशीचें हिंदी भाषांतर दिलें. नानासाहेब हे वयाच्या १०९ व्या वर्षी, १९२६ सालीं उत्तर प्रदेशांत मरण पावले असें त्यांत नमूद आहे. आजच्या ऐतिहासिक माहितीप्रमाणें, नानासाहेबांना एकच अपत्य ( मुलगी, बयाबाई आपटे ) होतें.


॥ श्री ॥

# दि बृहन्महाराष्ट्र शुगर सिंडिकेट लिमिटेड, पुणें २.

३० सप्टेंबर १९५२ अखेरचा ताळेबंद, नफातोटा-पत्रक व संचालकांचा अहवाल ता. २८ जून १९५३ च्या भागीदारांच्या वार्षिक सभेंत भागीदारांनीं मंजूर केला आहे.

—दिपवाळीनंतर ( म्हणजे सुमारें पांच महिने )—

—: नवीन हंगामाची साखर करण्यास सुरुवात होईल. :—

संचालक मंडळानें ठेवी घेण्याची मर्यादा २५ लक्ष रुपयांनीं कमी केलेली आहे.

ठेवी घेण्याची मर्यादा दर वर्षी कमी केली जाईल व व्याजाचा बोजा कमी होईल.

ठेवींच्या व्याजाचे दर

★ मुदत तीन वर्षें — व्याज ७ [ सात ] टक्के.

★ मुदत एक वर्ष — व्याज ६ [ सहा ] टक्के.

शेअरचे व ठेवींचे फॉर्म सिंडिकेटच्या पुणें येथील मुख्य कचेरींत मिळूं शकतील.

९८० सदाशिव पेठ,
कॉमनवेल्थ बिल्डिंग,
लक्ष्मी रोड, पुणें २.
दि. ३० जून १९५३.

चंद्रशेखर गोविंद आगाशे,
बी. ए., एलएल. बी.,
सी. जी. आगाशे अँण्ड को.,
मॅनेजिंग एजंटस्.

## सोलापूर जिल्हा सहकारी संस्था व ग्रामपंचायती यांची संयुक्त परिषद्

## स्वागताध्यक्ष श्री. साठे यांचें भाषण

सोलापूर जिल्हा सहकारी संस्था व ग्रामपंचायतीच्या संयुक्त परिषदेस ता. १५ जून रोजीं सुरवात झाली. या प्रसंगीं स्वागताध्यक्ष श्री. गणपतराव साठे, एम. एल. सी. यांनीं केलेल्या या भाषणांतील कांहीं महत्त्वाचे मुद्दे खालीं देण्यांत येत आहेत.

या जिल्ह्यांत माजी जिल्हाधिपति कॅ. श्री. एस. पी. मोहिते यांच्या प्रोत्साहनानें व सहकारी खात्याचे मदतीनें एकूण ४९ सोसायटया स्थापन झालेल्या आहेत. या सोसायट्यांचे कामकाजास सुरुवात होऊन नुकतेच १ वर्ष होत असल्यानें व यंदाच्या दुष्काळी परिस्थितीची झळ या सोसायट्यांना लागल्यानें या प्रयोगाबद्दल आजच ठामपणें कांहीं विधान करणें योग्य होणार नाहीं. या सोसायट्यांपैकीं १५ मागासलेल्या लोकांकरतां स्थापन झालेल्या आहेत. या सोसायट्यांचे एकूण ७२५ सभासद असून त्यांपैकीं ५६० खातेदार सभासद आहेत. या सोसायट्यांना सरकारची प्रत्यक्ष मदत ( सबसिडी ) रु. ५०,६५० व कर्ज रु. ५४,०१० वगैरे मिळालेली आहे. याशिवाय या सोसायट्यांना चालू शेतीकरतां अल्प प्रमाणांत जिल्हा सहकारी मध्यवर्ती बँकेकडूनहि कर्ज मिळतें. या प्रयोगाच्या यशस्वितेवरच सर्व प्रांतांत मोठ्या संख्येनें अशा सोसायटया पुढें स्थापन करावयाच्या कीं काय हें अवलंबून असलेनें या सोसायट्यांच्या चालकांनीं हा प्रयोग यशस्वी करणेचा शक्य तितका प्रयत्न करावा अशी त्यांना आग्रहाची सूचना आहे.

आपणां सर्वांपुढें आज जो अत्यंत जिव्हाळयाचा प्रश्न आहे तो म्हणजे भारत सरकारनें सुमारें ६ महिन्यांपूर्वी जाहीर केलेली पंचवार्षिक योजना यशस्वी करून या योजनेचा फायदा जास्तींत जास्त प्रमाणांत अखिल जनतेस मिळून सर्वसाधारण नागरिकाचें राहणीचें मान वाढविणें व त्याचे उत्पन्नांत भर घालणें आणि त्यांचें जीवन अधिक सुखी करणें हा होय. पंचवार्षिक योजनेनुसार निरनिराळया प्रकारच्या योजनांसाठी जे रु. २०६७ कोटी खर्च व्हावयाचे आहेत त्यांत शेतीविकास योजना, पाणीपुरवठा योजना, उद्योग धंद्यांची वाढ, घरें बांधण्याची योजना, आरोग्यविषयक योजना, वगैरे योजनांसाठीं कीं ज्यांत ग्रामीण जनतेचे हितसंबंध अवलंबून आहेत अशा योजनेसाठी फार मोठ्या प्रमाणांत खर्च होणार आहेत. पंचवार्षिक योजनेचा मूळ उद्देश म्हणजे हल्लींची सामाजिक विषमता बदलणें हा होय व ही समाजरचना बदलतांना ज्या उपायांचा अवलंब करावयाचा ते उपाय पूर्णपणें लोकशाही तत्त्वावर असले पाहिजेत. पंचवार्षिक योजनेंतील उद्देश आणि योजना साध्य करण्याचे मार्ग या दोहोंकडे दृष्टि टाकल्यास असें स्वाभाविकपणेंच दिसून येईल कीं, पंचवार्षिक योजना यशस्वी करण्यासाठीं सहकारी चळवळीस फार मोठा बोजा शिरावर घ्यावा लागणार आहे. सामाजिक व आर्थिक विषमता व्यवहारांत नष्ट करणें आणि सर्व समाजाचें हित साधणें हाच पंचवार्षिक योजनेचा हेतु असल्यानें जितक्या विविध क्षेत्रांत समाजांतील घटक सहकारी तत्त्वावर एकत्र येऊन आपले सर्व आर्थिक व्यवहार चालवतील तितक्या प्रमाणांत हा हेतु साध्य होईल. हा बोजा उचलतांना सहकारी चळवळीस पंचवार्षिक योजनेनुसार खालीलप्रमाणें मदत मिळणें शक्य होईल.

( १ ) हल्लीं फक्त ऐपतवान शेतकऱ्यांना सहकारी चळवळीमार्फत कर्ज मिळूं शकतें, त्याऐवजी जे शेतकरी शेतीच्या धंद्यावर जेमतेम उदरनिर्वाह करणारे आहेत अशांना सुद्धां शेतीच्या धंद्याकरतां कर्जे मिळूं शकतील व यासंबंधीं तोट्याचा बोजा सरकार उचलेल.

( २ ) मध्यवर्ती सहकारी बँकांना आपली जबाबदारी पार पाडण्याकरतां सरकार जास्त प्रमाणावर कर्जे देईल.

( ३ ) अल्प मुदतीच्या कर्जाकरतां संस्थामार्फत देण्यांत येणाऱ्या कर्जाच्या मर्यादेचा उच्चांक १०० कोटीपर्यंत ठरविण्यांत आलेला आहे. याशिवाय ५ कोटी रुपयांची मध्यम मुदतीच्या कर्जाकरतां तरतूद करणेची योजना केलेली आहे. एकूण सरकारनें व सहकारी संस्थांनीं द्यावयाचा मध्यम मुदतीच्या कर्जाचा जास्तींत जास्त आंकडा २५ कोटींचा ठरविलेला आहे.

( ४ ) सहकारी संस्थांच्या नोकरवर्गाच्या शिक्षणाकरतां योजना आखलेल्या आहेत.

सहकारी विक्री-पद्धत:—सहकारी विक्रीचा संबंध सहकारी कर्जपुरवठा व सहकारी उत्पादन यांचेशीं जोडण्यांत यावा व शेतकी मालाचें रूपांतर करणारे उद्योगधंदे हें काम सहकारी संघाचे ताब्यांतच असल्यास शेतकऱ्यांना मालउत्पादनाचा फायदा मिळणें शक्य होतें व याकरतां पक्क्या मालांत रूपांतर करणाऱ्या सहकारी कारखान्यास उत्तेजन देण्यांत यावें, अशी प्लॅनिंग कमिशननी शिफारस केलेली आहे.

सहकारी शेतीस उत्तेजन:—सहकारी शेतकी सोसायट्यांना बि-बियाणें, औजारें पुरवठा, कर्ज पुरवठा, यांत्रिक मदत वगैरे बाबतींत सहकारी शेतीचें महत्त्व जाणून त्यास उत्तेजन दिलेलें आहे.

ग्रामीण उद्योगधंदे:—ग्रामीण उद्योगधंद्यांचे मदतीकरतां व औद्योगिक सहकारी सोसायट्यांचे मदतीकरतां पंचवार्षिक योजनेमध्यें २७ कोटी रुपयांची तरतूद केलेली आहे. सहकारी तत्त्वावर खेड्यांची व्यवस्था:—या बाबतींत प्लॅनिंग कमिशनचा असा हेतु आहे कीं, खेड्यांतील जमिनीची व्यवस्था ग्रामपंचायतीकडे असावी व खेड्यांतील सर्व जमिनी सहकारी तत्त्वाचे व्यवस्थेखाली आणाव्यात व याकरतां प्रयोगादाखल मध्यवर्ती सरकारनें ५० लाख रुपयांची तरतूद केलेली आहे.

सहकारी संस्थांचे दृष्टीनें एका जिव्हाळयाच्या प्रश्नाचा उल्लेख करावासा वाटतो. आज सुमारें ५० वर्षें ही चळवळ या प्रांतांत काम करीत आहे. व या चळवळीनें शेतकरी वर्गास व इतर वर्गास उत्पादनाचे कामासाठी व धंद्यासाठीं वेळोवेळीं बहुमोल मदत केलेली आहे. सहकारी कर्जपुरवठा अत्यंत अल्प दराचे व्याजानें होत असल्यानें फार मोठ्या प्रमाणावर व्याजाचा फायदा या वर्गास मिळतो. शेतकरी वर्ग मोठ्या संख्येनें आज या चळवळींत येऊं इच्छितो ही खरोखरच समाधानाची गोष्ट आहे. परंतु त्याबरोबर या वर्गास कर्जपुरवठा करणाऱ्या मध्यवर्ती बँकांच्या ठेवीमध्यें मात्र वाढ होण्याचे मार्ग खुंटले आहेत व त्यामुळें सहकारी कर्जपुरवठ्याचा फायदा घेऊं इच्छिणाऱ्या शेतकऱ्याची कांहीं प्रमाणांत निराशा होते याची मला जाणीव आहे. या बाबतींत सरकारकडून व रिझर्व्ह बँकेकडून मिळणाऱ्या कर्जाच्या मर्यादेवर बंधन असल्यानें या बाबतींत आपणांस शक्य तितक्या लवकर स्वयंपूर्ण होणें अत्यंत जरूर आहे. म्हणून दुष्काळी वर्षें सोडल्यास इतर चांगल्या दिवसांचे परिस्थितींत शेतकरी वर्गानें त्यांचेपाशीं वाढत्या भावामुळें मिळणारा फायदा जर बचत न करतां खर्च करून टाकला तर या वर्गाची फारच कुचंबणा होईल. म्हणून शेतकऱ्यांचे वैयक्तिक हितासाठीं व सहकारी कर्जपुरवठा पद्धतीस बळकटी आणण्यासाठी माझी सर्व प्रतिनिधींना अशी आग्रहाची विनंती आहे कीं, ज्यांना शक्य आहे अशा शेतकऱ्यांनीं काटकसरीचें महत्त्व जाणून आपल्या शिलकी रकमा परत सहकारी चळवळीकडेच जातील अशी खबरदारी घेणें अत्यंत जरूर आहे.

## HIGHER DIPLOMA IN CO-OPERATION RESULTS

**( The Co-operative Training College, Poona )**

The following students are declared to have passed the examination held in April, 1953. The names are arranged in the order of the class and number of marks obtained.

### First Class

Bhargava Prithvi Nath., Ligade Baburao Bandappa., Mathur Kailash Behari., Bhattacharjee Ramendra Narayan., Parekh Chiman H., Iyengar G. K. Shrinivas., Deshpande Vithal Bhimrao., Dave Keshavlal Jatashankar., Kadli Mahadeo Gurappa., Tiwari Narayan Prashad.

### Second Class

Pimprikar Madhukar Trimbak., Gosavi Raghunath Dattatraya., Khotkar Shankar Govind , Vyas Bhairo Ratan., Framroz Roda., Bhavsar Somabhai Joitram., Biradar Rayanagauda Basanagauda , Naik Balkrishna Venkanna., Chaubey Devaki Nandan., Raichur Satyabodha Shriniwasacharya., Patel Chandulal Gopalji., Sharma Ram Lala., Pradhan Rameshchandra Raghunathrao., Shetti Vinayak Narayan., Parulekar Shree Niwas., Gokhale Prabhakar Moreshwar., Shinde Vasantrao Balwantrao., Chaudhary Janardan Raghunath., Sonawane Tulshiram Motiram., Godbole Ramchandra Raghunath., Pillai V. G. Venugopalan , Vaidya Prabhakar Yeshwant., Tungare Bhalchandra Laxmanrao.

### Pass Class

Akruwala Purshottam Narottamdas., Patil Kalgouda Balgouda , Angal Laxman Ganesh., Varghese Puthidom George., Iyer R. Kalyanasubramoniam., Varma Bala Rama., Nair Krishna Pillai Bhaskaran., Saxena Hari Prashad., Katre Govind Trimbakrao., John Thengummootil V., Date Vasant Ganesh., Jain Winayak Vithalrao., Bohra Shiv Dutta., Godbole Yeshwant Ganesh., Hasamnis Narayan Pandurang., Samrani Bhagwant Yellappa., Shah Arvindlal Dabyabhai.

*Prizes have been awarded as under :—*

| Institution which has instituted the prize | Amount of Prize Rs. | To whom awarded |
|---|---|---|
| (1) Bombay State Co-operative Bank Ltd. | 100/- | Bhrgava Prithvi Nath |
| (2) Provincial Industrial Co-operative Association Ltd., | 50/- | Framroz Roda |

5, B. J. Road,
29th June 1953.

D. A. Shah,
Principal and Secretary,
Co-operative Training College,
Committee, Poona.

**उत्तर-प्रदेशांत पाण्यांचे दर वाढले**—उत्तर प्रदेश सरकारनें खरीपाच्या पिकासाठीं देण्यांत येणाऱ्या कालव्याच्या पाण्याचे दर ५० टक्क्यांनीं वाढविलें आहेत. वाढलेल्या दरामुळें सरकारला २,१०,००,००० रुपये अधिक उत्पन्न होईल. उत्तर-प्रदेश सरकार आता जमीनसुधारणा कर घेईल असें वाटत नाहीं. राज्यांतील लोकरीच्या वस्त्राचा धंदा वाढविण्यासाठी आल्मोरा जिल्ह्यांत ४० हजार रुपये खर्चून एक वीज-निर्मिति केंद्र उभारण्यांत येणार आहे.


## पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँक लि.

— पुणें शहर —

लक्ष्मी रोड

पोस्ट बॉक्स नं. ५११ ] [ टेलिफोन नं. २४८३

भोर, पौड व वडगांव ( मावळ ) येथें बँकेनें आपल्या नवीन शाखा-कचेऱ्या उघडल्या आहेत. येथें व इतर शाखांतही सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार व सहकारी सोसायट्यांना शेतीसाठीं कर्जें देणें, सोनें-चांदीचे तारणावर कर्जें देणें, वगैरे व्यवहार सुरू केले आहेत.

**चालू, सेव्हिंग्ज ठेवी स्वीकारल्या जातात.**

**अेक ते दहा वर्षें मुदतीच्या ठेवीही स्वीकारल्या जातात.**

१ वर्ष २ टक्के, २ वर्षें २॥ टक्के, ५ वर्षें ३ टक्के, ७ वर्षें ३॥ टक्के, १० वर्षें ४ टक्के. याशिवाय रुपये २५,००० अगर पुढील रकमा ३ ते ९ महिने मुदतीनें घेण्यांत येतात.

**दराबद्दल समक्ष चौकशी करावी.**

वरीलप्रमाणें सर्व व्यवहार पुणें येथें मुख्य कचेरींत व इतर शाखांमध्यें होत असून त्याशिवाय पुणें येथें सेफ डिपॉझिट व्हॉल्टस् व सेफ कस्टडीची सोय आहे. त्याचा फायदा खातेदारांनीं घ्यावा.

जास्त माहितीसाठीं लिहा अगर समक्ष भेटा.

मो. वि. रवडे,
मॅनेजिंग डायरेक्टर.



## बँक ऑफ पूना लि.

( शेड्यूल्ड बँक )

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल : | ५०,००,००० |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें : | २५,००,००० |
| वसूल भांडवल : | १२,५०,००० |

**—संचालक मंडळ—**

१ श्री. मुरलीधर चतुर्भुज लोया, चेअरमन
२ श्री. दत्तात्रय रामचंद्र नाईक, जे. पी.
३ डॉ. नारायण भिकाजी परुळेकर M. A. Ph. D. संपादक, सकाळ, पुणें.
४ श्री. फ्रामजी पी. पोचा, बियांचे व्यापारी.
५ श्री. नारायणदास श्रीराम सोमाणी
६ श्री. गणपतराव काळूराम नाईक, B. SC., B. E., LL. B.

शाखा—( १ ) भवानी पेठ, पुणें. ( २ ) सदाशिव पेठ, पुणें. ( ३ ) सोलापूर ( ४ ) सांगली.

व्याजाचे दर—चालू ठेव १/२ टक्का. सेव्हिंग्ज १॥ टक्का.

**मुदत ठेव:**—बँक १ ते ३ वर्षें मुदतीच्या ठेवी स्वीकारते. व्याजाबद्दल चौकशी करावी.

एक वर्षापेक्षा कमी मुदतीच्या ठेवींवर आकर्षक व्याज.

मुख्य ऑफिस व सांगली शाखेंत लॉकर्सची सोय.

मुख्य ऑफिस : ४९५ रविवार, पुणें २.

गो. गं. साठे,
मॅनेजर.


हें पत्र पुणें, पेठ शिवाजीनगर घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गानिवास', ८२१ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.